सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४३ | शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
७ नोव्हेंबर

- 'वंदे मातरम', भारतमातेचे वर्णन करणारे गीत बंकिमचंद्र यादावचंद्र चटर्जी यांनी लिहिले.
- वासुदेव बळवंत फडके यांना जन्मठेप शिक्षा ठोठवण्यात आली.
- महिला मताधिकार : अमेरिकेतील कोलोरॅडो राज्यातील महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला, असे करणारे दुसरे राज्य.
- प्रभात चा संत तुकाराम हा चित्रपट पुण्यातील प्रभात चित्रपटगृहात प्रकाशित झाला.
- एम. पतंजली शास्त्री यांनी भारताचे दुसरे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# हाशिमजी प्रेमजी कॉम्प्लेक्सचा श्वास वाढत्या अतिक्रमणाने कोंडला!

## अर्थकारणामुळे पालिका प्रशासन राजकारण करत असल्याचा नागरिकांचा आरोप!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर पालिकेतर्फे स्टेशन रोडवर हाशिमजी प्रेमजी हे मोठे व्यापारी संकुल आहे. या संकुलात विविध व्यावसायिकांची दुकाने आहेत. मात्र, अनेक व्यावसायिकांनी या व्यापारी संकुलाच्या फुटपाथवर अतिक्रमण केले आहे. यामुळे क्लासेसला जाणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी, ग्राहक व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. मोठ्या अर्थकारणामुळेच पालिका राजकारण करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. हे अतिक्रमण त्वरीत काढावे, अन्यथा मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

अतिक्रमणामुळे अनेक नागरिकांना रस्त्यावरच वाहने उभी करावी लागतात. या संकुलाकडूनच गलवाडेकडे जाणारा मुख्य रस्ता तसेच रेल्वे स्टेशनकडे जावे लागते. यामुळे या रस्त्यांवरुन रोज मोठ्या संख्येने लहान- मोठ्या वाहनांचा वापर असतो. परिणामी गर्दीमुळे मोठा अडथळा निर्माण होतो. अनेकदा अपघातही होतात. अनेक व्यापाऱ्यांनी दुकानाच्या बाहेर पत्री शेड उभे करुन अतिक्रमण केले आहे. काहींनी तर फुटपाथवरच दुकानासमोरच खाद्य पदार्थ विक्रीच्या टपऱ्या उभारल्या आहेत. या व्यापारी संकुलात मोठ्या प्रमाणात क्लासेस आहेत. यामुळे व्यापारी संकुलाल 'कोचिंग हब' असेही म्हटले जाते. क्लासेससाठी शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या व्यापारी संकुलात येत असतात. मात्र, अतिक्रमणामुळे त्यांना जाण्यासही मोठा अडथळा निर्माण होतो. परिसरातील रहिवाशांनी अनेक वेळा पालिकेकडे अतिक्रमण काढण्याबाबत तक्रारी केल्या आहेत. मात्र, पालिका प्रशासन मूग गिळून गप्प आहे. अतिक्रमीत दुकानदारांना "वरदहस्त" असल्यानेच अतिक्रमण कायम आहे की काय? असा संशयही अनेक जण व्यक्त करतात.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

### अतिक्रमण विभागाचे दुर्लक्ष!

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी पालिकेचे अतिक्रमण विभागाने हाशिमजी कॉम्प्लेक्स परिसराची पाहणी केली होती. काही दुकानदारांना अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले होते. मात्र, तरीही या आदेशाला न जुमानता संबंधित दुकानदारांनी पुन्हा पत्र्याचे शेड उभारून अतिक्रमण वाढवले असल्याचा आरोप होत आहे. अतिक्रमण विभागप्रमुख राधेश्याम अग्रवाल आणि संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आज भव्य अल्पसंख्याक मेळावा

### आमदार सना मलिक, जिशान बाबा सिद्दीकी, फारूक शाह, नजीब मुल्ला व अॅड.नाझेर काझी यांची उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अल्पसंख्याक विभागाचा शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात दुपारी साडेतीनला भव्य मेळावा होणार आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी असतील. अल्पसंख्याक समाजाचे नेते आमदार सना मलिक, माजी आमदार जिशान बाबा सिद्दीकी, माजी आमदार फारूक शाह, अल्पसंख्याक समाजाचे युवा नेते नजीब मुल्ला व राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अॅड. नाझेर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पवार मेळाव्यास उपस्थित राहतील.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा होणार आहे. यामुळे मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. तालुक्यातील मुस्लिम समाजबांधवांना मेळाव्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. मेळाव्याप्रसंगी शहर व तालुक्यातील मुस्लिम समाजबांधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, अमळनेर शहर व तालुका विकास आघाडीच्या सर्व घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष मुक्तार खाटीक, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाचे तालुकाध्यक्ष अलीम मुजावर व शहराध्यक्ष कलीमोद्दीन शेख यांनी केले आहे.

दरम्यान, या मेळाव्यात नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांबाबत पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात येईल.

**रश्मिका मंदानाने विजय देवरकोंडासोबतच्या साखरपुड्यावर प्रथमच केले भाष्य** ...पान २ वर

**क्रिकेटर नसता तर रवींद्र जडेजा काय करत असता?** ...पान २ वर

**कर्त्या पुरुषांच्या आत्महत्येनंतर अंधारलेल्या आयुष्यात पेटविली 'जीवनज्योत'** ...पान ३ वर

**देवाचे दर्शन थेट घेता येणे शक्य!** ...पान ४ वर

# अमळनेर तालुका क्रीडा संकुल बनले तळीरामांचा अड्डा!

## मैदानातच दारुच्या बाटल्यांचा खच; क्रीडाप्रेमी, नागरिकांमध्ये नाराजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील प्रताप महाविद्यालयापासून काही अंतरावर कोट्यवधी रुपये खर्चून तालुका क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. मात्र, या क्रीडा संकुलाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. मैदानावरच मद्याच्या बाटल्यांचा खच पडल्याने हे क्रीडा संकुल टवाळखोर व तळीरामांसाठ जणू दारुचा अड्डाच बनले आहे. प्रशासनाने याकडे गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी क्रीडाप्रेमींसह नागरिकांनी केली आहे.



(छायाचित्र : योगेश महाजन)

क्रीडा संकुलाच्या आवारात दारूच्या बाटल्यांचे ढीग लागला आहे. मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. दुर्गंधीमुळे क्रीडा संकुलात जाणाऱ्या तरुणांचे आरोग्य धोक्यात आले आहे. क्रीडा संकुलात सुरक्षेबाबत कोणतीही उपाययोजना केलेल्या नाहीत. रात्रीच्या वेळी क्रीडा संकुलात कोणीही जात नसल्याने टवाळखोर याचा गैरवापर करीत आहेत. संकुलाच्या प्रवेशद्वारावर गेटही बसविण्यात आलेले नाही. सुरक्षा रक्षकाचीही नेमणूक करण्यात आलेली नाही. हे क्रीडा संकुल अनेक गुंडांचे आश्रयशस्थान बनले, आहे की काय? असा प्रश्न नागरिकांनी केला आहे.

क्रीडा संकुल हे तरुणांसाठी खेळ, व्यायाम व शारीरिक सुदृढतेसाठी बांधण्यात आले आहे. पोलीस भरतीसाठी तयारी करणारी अनेक युवक- युवती रोज संकुलात सरावासाठी जातात. मात्र, मैदानावरच पडलेल्या फुटलेल्या बाटल्या, दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरण त्यांना सराव करण्यास अडथळा आहे. इतरत्र पसरलेल्या फुटलेल्या काचांमुळे अनेक जणांच्या पायास गंभीर जखमाही झाल्या आहेत. क्रीडा संकुलाच्या परिसरात पथदिव्यांचीही व्यवस्था नाही.

संकुलाच्या चोहो बाजूस मोठे व मजबूत कंपाऊंड करण्यात यावे. प्रवेशद्वारावर दणकट गेट बसवावेत. सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात याव्यात. कायमस्वरुपी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात यावी. पोलिसांनी रात्री गस्त ठेवावी, अशी मागणी क्रीडापटूंसह सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.



(छायाचित्र : मयुर चौधरी)

# गोधडी बाजार नव्हे हे तर फरशी पुलाचे कठडे ...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर येथील फरशी पुलाच्या दोन्ही बाजूला लोखंडाचे रेलिंग कठडे आहेत. हल्ली नदीला भरपूर पाणी आहे. पाणीही बऱ्यापैकी स्वच्छ आहे. त्यामुळे खास करून नदीकाठच्या परिसरालगतच्या अनेक महिला येथे धुणे धुण्यासाठी येत आहेत. दुपारी बऱ्यापैकी कडक ऊन पडते आहे .हल्ली चादरी, गोधड्या, सतरंज्या आधी जे घरी मोरीत किंवा छोट्या जागी धुणे शक्य नसते ते नदीतल्या मोकळ्या-चोकळ्या पाण्यात धुण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आणले जातात. धुतल्यानंतर त्यांना कठड्यांवर वाळत घालतात .या सर्व रंगीबिरंगी गोधड्या व चादरी पाहून हा गोधड्यांचा बाजार तर नाही ना? असे वाटणे स्वाभाविक आहे.

# वाढदिवसाचा खर्च टाळून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत

## कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटलांचा विधायक उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांनी त्यांच्या वाढदिवशी खर्च टाळून शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली आहे. त्यांच्या या विधायक उपक्रमाचे तालुक्यातून कौतुक होत आहे.



अशोक पाटील



सौ.योगिता पाटील

सभापती अशोक पाटील यांचा वाढदिवस दरवर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी मोठ्या जल्लोषाने साजरा करतात. तसेच अशोक आधार पाटील व सौ. योगिता अशोक पाटील यांच्या विविध शैक्षणिक संस्थांचे कर्मचारी, आधार फाउंडेशनचे कार्यकर्ते, अशोकभाऊ मित्र मंडळाचे पदाधिकारी विविध उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करतात. मात्र, यावर्षी अशोक पाटील यांच्या अर्धांगिनी आधार फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. योगिता पाटील या मुडी- मांडळ जिल्हा परिषद गटात उमेदवारीसाठी इच्छुक आहेत. या गटातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तालुक्यातही अनेक ठिकाणी कापूस, मका उत्पादक शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

पान ३ वर

## " वन्दे मातरम्"चा आज १५०वा वर्धापनदिन

# जुलमी ब्रिटिशांनाही धडकी भरवणाऱ्या 'दोन' शब्दांचा ज्वालाग्रही इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वन्दे मातरम्च्या जन्मापासूनचा इतिहास विविधांगी बहुमिती आहे. इतिहासातील चढ-उतार या लेखात देण्याचा प्रयत्न आहे. त्यात जशी प्रेरणादायी पर्वे आहेत, तशी खंत बाळगावी अशा घटना देखील आहेत. जुलमी ब्रिटिशांनी ज्या दोन शब्दाचा धसका घेतला त्यांच्या उरात धडकी भरली, अशा या दोन शब्दांनी अत्यंत प्रेरक आणि ज्वालाग्रही इतिहास घडवला आहे. या दोन शब्दांमुळे भारतीयांमधील राष्ट्रीय भावना उफाळून आली. त्यांच्यातला बंधुभाव जागृत झाला. वंदे मातरम हे भारतीय देशभक्ताच्या हाती आलेले अमोघ अस्त्र ठरले. शत्रूवर प्रहार करण्यासाठी आपण वापरता येईल आणि शत्रूंनी केलेले वार परतवण्यासाठी ढालीसारखे वापरता येईल असे अस्त्र ठरले. त्या अभूतपूर्व प्रसंगाचा भारतीयांना अभिमान वाटावा असा या वंदेमातरम् राष्ट्र मंत्राचा वर्धापनदिनानिमित्त इतिहास...

अथर्ववेदातील द्वादशकांडातील त्रेसष्ठ सुक्तांमध्ये अथर्वन् ऋषींनी पृथ्वीला माता म्हणून संबोधिले. हे "पृथ्वीसुक्त" म्हणजेच भारताचे आद्य वैदिक राष्ट्रगीत. १७६२ ते १८८४ या काळात बिहार, बंगाल, ओरिसाच्या जंगल भागात संन्याशांनी उठाव केला. या ओठावरचे घोषवाक्य होते "ॐ वंदे मातरम्". बंकिमचंद्र चटोपाध्याय एकदा गंगेच्या तीरावर गेले. तेथील कोळी बांधवांनी गायिलेले "साधू आछे मा मने । दुर्गाबले प्राण त्यजिव जान्हवी जीवने" हे लोकगीत त्यांनी ऐकले आणि "वन्दे मातरम्" शब्दांचे बीजारोपण त्यांच्या मनावर झाले. कार्तिक शुद्ध नवमी शके १७९७ अक्षय नवमी रविवार ७ नोव्हेंबर १८७५ या दिवशी नैहाटी येथे बंकिमचंद्रांनी संपूर्ण "वंदे मातरम" सलग एका बैठकीत लिहिले आणि एका राष्ट्रमंत्राचा जन्म झाला.

१८७६ मध्ये यदुनाथ भट्टाचार्य यांनी वन्दे मातरम्ला मल्हार रागात संगीतबद्ध केले. २८ डिसेंबर १८९६ मध्ये रवींद्र ठाकूर यांनी कलकत्त्यामध्ये भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात प्रथम जाहीर गायन झाले. १६ ऑक्टोबर १९०५ या दिवशी रवींद्रनाथांच्या नेतृत्वाखाली रक्षाबंधनासाठी गंगातीरी हजारो लोकांनी एकत्रपणे वन्दे मातरम्चा जयघोष केला. पुढे १६ ऑक्टोबर १९०५ मध्ये महात्मा गांधी यांनी वन्दे मातरम वर पहिले वक्तव्य केले. २८ नोव्हेंबर १९०५ ला वन्दे मातरम् यावर सरकारी बंदी आणली. (लोन सर्कुलर) २०० विद्यार्थ्यांनी वन्दे मातरम् म्हटले. म्हणून रंगपूर येथील प्रत्येकी विद्यार्थ्याला पाच रुपये दंड ठोठावण्यात आला. २७ डिसेंबर १९०५ मध्ये वाराणसी येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात सरलादेवी चौधुराणी यांनी अध्यक्षांचा विरोध पत्करून संपूर्ण वन्दे मातरम्चे गायन केले. त्यानंतर भगिनी निवेदिताने तयार केलेल्या बंगालीतील वन्दे मातरम्चा ध्वज त्याच बैठकीत त्यांनी दाखविला.

नागपूरच्या नील सिटी प्रशालेत डॉ. हेगडेवार यांनी वन्दे मातरम् म्हणत शाळेवर बहिष्कार टाकला. १९ वर्षाचा वंगवीर खुदीराम बोस यांनी १९ ऑगस्ट १९०८ ला वंदे मातरम म्हणत फासावर लटकले. वन्दे मातरम् म्हणून फाशी घेणारा हा पहिला तरुण क्रांतिकारक. १७ ऑगस्ट १९०९ मध्ये मदनलाल धिंग्रा वन्दे मातरम् म्हणतच इंग्लंडमध्ये हसत हसत फासावर गेले. हे परदेशात फाशी जाणारे पहिले क्रांतिकारक. डिसेंबर १९२३ मध्ये काकीनाडा येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात अध्यक्ष मौलाना अहमद अली यांनी वन्दे मातरम् म्हणण्याला पहिला विरोध केला. तो विरोध टाळून पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी संपूर्ण वन्दे मातरम्चे गायन केले. नागपूरमध्ये १४ वर्षांच्या अंभईकरांनी महात्मा गांधींना संपूर्ण वन्दे मातरम् गाऊन दाखवले. क्रांतिकारक राजेंद्र लाहिरी यांनी १८ डिसेंबर १९२७ ला वंदे मातरम् म्हणत म्हणत हौतात्म्य पत्करले. क्रांतिकारक पंडित रामप्रसाद बिस्मिल, क्रांतिकारक अश्फाक उल्ला खान, क्रांतिकारक रोशन सिंग यांनीही वन्दे मातरम् म्हणत म्हणतच आपले प्राण मातृभूमीच्या चरणी अर्पण केले. क्रांतिवीर सूर्यसेन मास्टरदा यांनी कारागृहात "वन्दे मातरम्" म्हटल्यामुळे अमानुष मारहाण करण्यात आली. बेशुद्धावस्थेत त्यांना क्रूर इंग्रजांनी फासावर चढवले. २३ मार्च १९३१ या दिवशी लाहोर येथे सरदार भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी वन्दे मातरम् म्हणत म्हणत भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले.

लोकशाही स्वराज्य पक्ष, हिंदू महासभा यांनी पुण्यात मादाम कामांच्या वन्दे मातरम् ध्वजाची भव्य मिरवणूक २६ ऑक्टोबर १९३७ मध्ये काढली. स्वातंत्र्यवीर सावरकर, सेनापती बापट, ग.वि.केतकर, मास्टर कृष्णराव यांची ओजस्वी भाषणे त्यावेळी झाली. आंध्र प्रदेशातील चप्पलमुंडा तुरुंगात १९३८ मध्ये रामचंद्रराव या कैद्याने वन्दे मातरम्च्या घोषणा दिल्या. म्हणून त्यांना सतरा फटक्यांची शिक्षा झाली. पुढे त्यांना वन्दे मातरम् रामचंद्रराव या नावाने ओळखले जाऊ लागले. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील ६० विद्यार्थ्यांनी वन्दे मातरम् गायल्याबद्दल त्यांना काढून टाकण्यात आले होते.

१९३८ मध्ये नागपूर मध्ये भरलेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अध्यक्षीय भाषण करताना " हिंदू राष्ट्र व वंदे मातरम्च्या रक्षणासाठी लढायला तयार व्हा " असे आवाहन केले होते. तर जिना यांनी वंदे मातरम् नष्ट करावे अशी मागणी केली.

पान २ वर





## ‘दोन’ शब्दांचा ज्वालाग्रही इतिहास

**पान १ वरून :** ७ ऑगस्ट १९३८ मध्ये मुंबई आकाशवाणीवर मास्टर कृष्णराव यांनी वन्दे मातरम् गाण्यास सुरुवात केली. त्यामुळे आकाशवाणीचे स्टेशन मास्तर झेड. बुखारी यांनी वीज प्रवाह बंद केला आणि त्यांचे गायन बंद पाडले. १९४३ मध्ये मद्रासच्या हिंदी सेनेतील नऊ बंगाली युवकांनी वन्दे मातरम्च्या घोषणेसाठी आत्मबलिदान केले. १९४८च्या चैत्र पाडव्याच्या दिवशी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सूचनेनुसार मास्टर कृष्णराव यांनी गायलेले वन्दे मातरम् प्रसारित करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या दिवशी १५ ऑगस्ट १९४७ ला पहाटे ६ वाजून ३० मिनिटांनी देशातील सर्व आकाशवाणी केंद्रावरून पंडित ओंकारनाथ ठाकूर यांनी गायलेले संपूर्ण वन्दे मातरम् प्रसारित करण्यात आले. त्यानंतर सकाळी सात वाजता मुंबई आकाशवाणीवरून गानहिरा हिराबाई बडोदेकर यांनी गायलेले वन्दे मातरम् प्रसारित झाले. २२ ऑगस्ट १९४७ मध्ये कलकत्त्यात वन्दे मातरम्चा गौरव महात्मा गांधी यांनी केला. त्यावर त्यांनी भाषण दिले. २५ ऑगस्ट १९४८ ला वन्दे मातरम् ऐवजी जन- गण- मन म्हणावे असे वक्तव्य पंडित नेहरू यांनी केले. त्यासाठी मास्टर कृष्णराव यांनी संसदीय पातळीवर खूप मोठा लढा दिला. २४ जानेवारी १९५० या दिवशी घटना समितीने जन- गण- मन हे राष्ट्रगीत आणि वन्दे मातरम् यांना राष्ट्रीय गीत म्हणून मान्यता दिली. २६ फेब्रुवारी १९७३ मध्ये मुंबईत उर्दू शाळेत वन्दे मातरम् म्हणण्यास नकार दिला. मुंबईत हिंदू महासभेच्या महिलांनी प्रतिकार करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात मोर्चा काढला आणि आपला निषेध नोंदवला. मोर्च्यातील व्यक्त्यांनी सांगितले की, मातेचे गुणगान करायला शब्द अपुरे पडतात. जे भारत मातेचे खरेखरे पूत्र आहेत त्यांना त्यांची मातृभूमी सर्व आपदातून मुक्त झाली असे खरोखरच वाटते का? तांत्रिक स्वातंत्र्यप्राप्त झाले का ? मातृभूमीच्या खऱ्या बेड्या गळून पडल्या, तिच्या साऱ्या दुःखाचा निरास झाला असे ठरते. खऱ्या अर्थाने तर आपली भारत माता स्वतंत्रही नाही आणि स्वावलंबी नाही. धन- धान्य-शस्त्र- शास्त्र शिक्षण यापैकी आज कशासही ही भूमी स्वतंत्र आणि स्वावलंबी आहे का? कोट्यावधी रुपयांची कर्जे. शस्त्रास्त्रांच्या अभावी परक्यापुढे केविलवाणी हात पसरण्याची पाळी. प्रचंड भ्रष्टाचार. अनेक साऱ्या समस्या. या सगळ्या दुरावस्थेचे कारण एकच आम्ही वन्दे मातरम् हा मंत्र विसरलो. आम्ही आमचे पुत्रत्व गमावून बसलो. मातृभूमीला अडगळीत टाकले. भारतमातेला ज्यांच्याबद्दल अभिमान वाटेल. ज्यांच्या कृतींनी तिची मान उंचावेल, ज्यांच्या पराक्रमाने तेजस्वी अस्मितेने तिचे मुखमंडल पुनश्च उजळून निघेल. अशा तिच्या पुत्राबद्दल तिच्या अंतःकरणात अपार प्रेम आणि आत्मीयताआहे. ती कायम राहावी. ती स्थिर असावी. तिला सुख लाभावे. तिला सदा गौरवाचे, प्रतिष्ठेचे मानाचे स्थान असावे. मग आम्ही राहिलो न राहिलो तरी चालेल.. तेरा वैभव अमर रहे माँ। हम दिन चार रहे ना रहे ॥. वन्दे मातरम्...!

# बिल गेट्स के ७ प्रेरक मंत्र:
## अमीर और कामयाब बनने की राह दिखाते विचार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिल गेट्स, माइक्रोसॉफ्ट के संस्थापक और दुनिया के सबसे अमीर व्यक्तियों में से एक, ने एक छोटे से गैराज से अपनी कंपनी शुरू की थी। आज माइक्रोसॉफ्ट वैश्विक आईटी उद्योग की अग्रणी कंपनी है। गेट्स की सफलता के पीछे उनकी मेहनत, दूरदृष्टि और सीखने की ललक है। उन्होंने युवाओं को प्रेरित करने वाले कई मंत्र साझा किए हैं, जो अमीर और कामयाब बनने का रास्ता दिखाते हैं। आइए जानते हैं उनके ७ प्रेरक विचार।

### १९ साल की उम्र में शुरू की प्रोग्रामिंग

बिल गेट्स में बचपन से ही सीखने की जिज्ञासा थी। १९ साल की उम्र में उन्होंने प्रोग्रामिंग शुरू की और पहला सॉफ्टवेयर बनाया। हार्वर्ड यूनिवर्सिटी से पढ़ाई छोड़ने के बाद उनकी सीखने की भूख और बढ़ी। गेट्स कहते हैं, “जिज्ञासा और नई चीजें सीखने की आदत आपको हमेशा आगे ले जाती है।”

### सीखने की आदत बनाए रखें

गेट्स का मानना है कि नई चीजें सीखने से कभी पीछे नहीं हटना चाहिए। किताबें पढ़ना, नई स्किल्स सीखना और ज्ञान अर्जित करना सफलता की नींव है। वे कहते हैं, “जो लगातार सीखता है, वही आगे बढ़ता है।”

### समस्याओं का समाधान खोजें

गेट्स के अनुसार, समस्याएं हर किसी की जिंदगी का हिस्सा हैं, लेकिन उनसे भागने के बजाय तार्किक सोच के साथ समाधान निकालना चाहिए। वे कहते हैं, “समस्याएं चुनौतियां नहीं, अवसर हैं। लॉजिक और धैर्य से हर मुश्किल का हल निकलता है।”

### भविष्य की जरूरतों को समझें

माइक्रोसॉफ्ट की स्थापना तब हुई, जब कंप्यूटर एक नई तकनीक थी। गेट्स ने भविष्य की संभावनाओं को पहचाना और उसी दिशा में काम शुरू किया। वे सलाह देते हैं, “दूरदृष्टि विकसित करें। समझें कि आने वाला समय किन चीजों की मांग करेगा और उसी के लिए तैयार रहें।”

### परिश्रम और अनुशासन है जरूरी

गेट्स मानते हैं कि बिना मेहनत और अनुशासन के कोई भी लक्ष्य हासिल नहीं होता। वे कहते हैं, “महानता हासिल करने के लिए कठिन परिश्रम और अनुशासित जीवनशैली अपनानी होगी। लक्ष्य तक पहुंचने के लिए तपस्या जरूरी है।”

### असफलता है सफलता की सीढ़ी

गेट्स के अनुसार, असफलता आपको गलतियों से सीखने और सुधार करने का मौका देती है। वे कहते हैं, “असफलता का डर छोड़ दें। यह आपको बताती है कि कहां सुधार की जरूरत है और कैसे बेहतर किया जा सकता है।”



### समाज सेवा और परोपकार

बिल गेट्स दुनिया के सबसे बड़े परोपकारी व्यक्तियों में से एक हैं, जिन्होंने बिल एंड मेलिंडा गेट्स फाउंडेशन के जरिए अरबों डॉलर दान किए हैं। वे मानते हैं, “संपत्ति का सही उपयोग वैश्विक समस्याओं जैसे स्वास्थ्य, शिक्षा और गरीबी उन्मूलन के लिए करना चाहिए। परोपकार से दुनिया बेहतर बनती है।” बिल गेट्स की ये सात बातें न केवल अमीर बनने की प्रेरणा देती हैं, बल्कि एक सार्थक और प्रभावशाली जीवन जीने का रास्ता भी दिखाती हैं। उनकी सीख को अपनाकर आप भी अपने सपनों को हकीकत में बदल सकते हैं।

## कोथिंबीर लवकर सडते, मिरची काळी पडते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्यापैकी अनेकांना आठवडाभराचा सामना आणून ठेवण्याची सवय असते. त्यात आपण भाजीपाल्यासह फळे, कोथिंबीर, आले किंवा मिरच्या आणून ठेवतो. पण कितीही स्वच्छ करून फ्रीजमध्ये ठेवल्या, तरी काही दिवसांतच खराब होतात. कोथिंबीरची पाने अनेकदा सुकतात आणि मिरच्या व्यवस्थित साठवल्यानंतर कुजण्यास सुरूवात होते.

कोथिंबीर जास्त दिवस टिकविण्यासाठी सगळ्यात आधी ती स्वच्छ पाण्याने धुवा. नंतर पूर्णपणे वाळवा. टिश्यूपेपरमध्ये गुंडाळा आणि हवाबंद डब्यामध्ये साठवून ठेवा. टिश्यूपेपर कोथिंबीरमधील ओलावा शोषून घेईल. ज्यामुळे लवकर खराब होणार नाही. हिरव्या मिरच्या जास्त काळ ताज्या ठेवण्यासाठी आपल्याला त्याचे देठ तोडून घ्यावे लागेल. नंतर त्यांना कोरड्या डब्यात ठेवा. मग फ्रीजमध्ये ठेवा. आपण मिरच्यांना कागदी पिशव्यांमध्ये देखील ठेवू शकतो. ज्यामुळे त्या फ्रेश राहतील. आल्यालाही बुरशी लागते. जर आपल्यालाही या समस्येला सामोरे जावे लागत असेल, तर या सोप्या टिप्स लक्षात ठेवा. आले जास्त काळ टिकविण्यासाठी आपल्याला त्याचे लहान तुकडे करून घ्यावे लागतील. नंतर त्याला झिपलॉक बॅगमध्ये देखील ठेवून फ्रीजमध्ये ठेवता येईल.

# दोनदा अपयश, तिसऱ्या प्रयत्नात आयएएस बनल्या अर्चना कुमारी

**यशोगाथा :**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिहारच्या नवादा जिल्ह्यातील अर्चना कुमारी यांनी महागड्या कोचिंगशिवाय स्व-अभ्यासाच्या जोरावर यूपीएससी २०२० परीक्षेत ११० वी रँक मिळवून आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न साकार केले. याशिवाय त्यांनी भारतीय आर्थिक सेवा (आयईएस) आणि बिहार लोकसेवा आयोग (बीपीएससी) परीक्षांमध्येही यश मिळविले.



### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

अर्चना यांचे वडील राजेंद्र प्रसाद हे मुख्याध्यापक आहेत. त्यांच्या आईचे निधन झाले आहे. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या अर्चनांनी बिहारमधून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर दिल्लीतील लेडी श्री राम कॉलेजमधून अर्थशास्त्रात पदवी आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून (जेएनयू) अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळविली.

### यूपीएससीचा प्रवास

पदव्युत्तर शिक्षणानंतर अर्चनांनी यूपीएससी नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरू केली. महागड्या कोचिंग क्लासेसला नकार देत त्यांनी स्व-अभ्यासावर भर दिला. पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये अपयश आले. परंतु त्यांनी जिद्द आणि आत्मविश्वास कायम ठेवला. या काळात त्यांनी २०१९ मध्ये भारतीय आर्थिक सेवा आणि बिहार लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण केली, ज्यात त्यांना बीपीएससीमध्ये सहावे स्थान मिळाले. अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी यूपीएससी २०२० मध्ये ११० वी रँक मिळवत आयएएस अधिकारी होण्याचा मान मिळवला.

### वैयक्तिक जीवन

यूपीएससी २०२० मध्येच ३४ वी रँक मिळवणाऱ्या मध्य प्रदेशातील भारतीय वन सेवा (आयएफएस) अधिकारी विवेक सिंह यांच्याशी अर्चनांनी लग्न केले. सध्या त्या मध्य प्रदेश केडरच्या आयएएस अधिकारी असून, कृषी मंत्रालयात सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत आहेत.
अर्चना कुमारी यांची कहाणी कठोर परिश्रम, समर्पण आणि योग्य दिशेने केलेल्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. स्व-अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी अपयशाला यशात बदलले, जी यूपीएससी उमेदवारांसाठी मोठी प्रेरणा आहे.

# क्रिकेटर नसता तर रवींद्र जडेजा काय करत असता?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रवींद्र जडेजा हा नावाजलेला अष्टपैलू क्रिकेटपटू जगभरातील क्रिकेट चाहत्यांचा लाडका आहे. कसोटी क्रिकेटमधील सर्वोत्तम अष्टपैलू म्हणून त्याने आपली ओळख निर्माण केली आहे. पण जर तो क्रिकेटर नसता, तर काय करत असता? आणि तो जगातील सर्वोत्तम अष्टपैलू कसा बनला? चला, जाणून घेऊया...



### जडेजाची अष्टपैलू कामगिरी

रवींद्र जडेजाने कसोटी, वनडे आणि टी-२० अशा तिन्ही फॉरमॅट्समध्ये देशासाठी अप्रतिम कामगिरी केली आहे. विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये त्याने अव्वल स्थान पटकावले आहे. अलीकडेच वेस्ट इंडिजविरुद्ध २०२५ मधील कसोटी मालिकेत त्याने नाबाद शतक आणि दुसऱ्या डावात चार विकेट्स घेऊन भारताचा विजय सोपा केला. या सामन्यात तो ‘ मॅन ऑफ द मॅच ’ ठरला. जडेजाने ८६ कसोटी सामन्यांत (अहमदाबाद कसोटी २०२५ पर्यंत) ३,९९० धावा (६ शतके, २७ अर्धशतके) आणि ३३४ विकेट्स घेतल्या आहेत. भारतीय गोलंदाजांमध्ये कसोटी विकेट्सच्या बाबतीत तो पाचव्या क्रमांकावर आहे. त्याने २५ वेळा ‘मॅन ऑफ द मॅच’ पुरस्कार मिळवला आहे.

### क्रिकेटर होण्याचा प्रवास

जडेजाचा जन्म ६ डिसेंबर १९८८ रोजी गुजरातमधील जामनगर येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. लहानपणापासून त्याला खेळाची आवड होती, पण क्रिकेटला करिअर म्हणून निवडण्याला त्याच्या वडिलांचा विरोध होता. रविचंद्रन अश्विनला दिलेल्या मुलाखतीत जडेजाने सांगितले की, त्याचे वडील क्रिकेटचा उल्लेख झाला तर त्याला खोलीत कोंडण्याची धमकी देत. त्यांना जडेजाने भारतीय सैन्यात करिअर करावे असे वाटत होते, कारण त्यांचे काही मित्र सैन्यात होते.
पण जडेजाने आईच्या पाठिंब्याने गुपचूप क्रिकेट सराव सुरू केला. अंडर-१४ स्तरावर त्याची चमक दिसू लागली आणि त्याच्या कामगिरीचे फोटो, बातम्या वृत्तपत्रांत छापून येऊ लागल्या. हळूहळू वडिलांचा विरोध मावळला आणि त्यांनी जडेजाला क्रिकेट खेळण्याची परवानगी दिली. जडेजाने बॅट आणि बॉलच्या जोरावर देशाचे नाव उंचावले आणि सर्वोत्तम अष्टपैलू बनला.

### क्रिकेटर नसता तर?

जडेजाने क्रिकेट न निवडले असते, तर कदाचित तो भारतीय सैन्यात दाखल झाला असता. त्याच्या वडिलांच्या इच्छेनुसार तो सैन्यात जाऊन देशसेवा करत असता. पण क्रिकेटच्या मैदानावर त्याने बॅट आणि बॉलने जे युद्ध जिंकले, त्याने तो देशाचा अभिमान बनला. रवींद्र जडेजाची मेहनत, जिद्द आणि प्रतिभा यामुळे तो आज जगातील सर्वोत्तम अष्टपैलू आहे. त्याने क्रिकेटच्या प्रत्येक फॉरमॅटमध्ये आपली छाप पाडली. जर तो क्रिकेटर नसता, तर कदाचित सैन्यातून देशाची सेवा करत असता, पण क्रिकेटमुळे त्याने जगभरात भारताचा झेंडा फडकवला.









हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# कर्त्या पुरुषांच्या आत्महत्येनंतर अंधारलेल्या आयुष्यात पेटविली 'जीवनज्योत'

## कट्यार गावातील ज्योतीताई देशमुख यांची संघर्षमय कहाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विदर्भातल्या अकोल्यापासून २५ किलोमीटर अंतरावरील कट्यार गाव. श्रीमती ज्योतीताई संतोष देशमुख (वय ५५) या गावातील रहिवासी आहेत. पती, दीर आणि सासरे या तिघांनी आत्महत्या केली. घरातील कर्ते पुरुष गेल्यानंतर ज्योतीताई २९ एकर शेती एकट्या कसत आहेत. आयुष्यात अंधार असतानाही त्यांनी नव्याने उभारी धरुन जीवनज्योत पेटविली आहे. त्यांची ही संघर्षमय गाथा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

त्यांच्या घराचे लोखंडी दार आणि आत बसवलेला सीसीटीव्ही कॅमेरा बघून अनेक प्रश्न निर्माण होतात. घरात आणलेली नवीन वस्तू चोरीला जाते म्हणून घराला लोखंडी दार आणि आत सीसीटीव्ही कॅमेरा बसवल्याचे त्यांनी सांगितले. शेतीने आपल्याला आयुष्यात खूप काही दिल्याचे त्या सांगतात.

शेतीमुळे मी घराचे बांधकाम केले. नवीन ट्रॅक्टर घेतला. शेतात बोअरवेल केला. त्याला चांगले पाणीही लागले. मुलाला इंजीनियर केले. सध्या तो पुण्यात एका कंपनीत नोकरी करीत आहे. पूर्वी ते शेतात फक्त मूग घेत होते. २००७ मध्ये खूप पाऊस झाला आणि संपूर्ण मूग आडवा झाला. माठे नुकसान झाले. या विवंचनतून त्यांच्या पतीने आत्महत्या केली. घरातील तीन पुरुषांच्या आत्महत्येनंतर ज्योतीताई पूर्णपणे एकट्या पडल्या होत्या. रोड टच जमीन असल्याने अनेकांनी त्यांना जमीन विकण्याचा सल्ला दिला. बाईने कुठे शेती करायची असते का, देशमुखांच्या घरातल्या बाईने शेती करणे शोभते का? शेती विकून अकोल्याला राहायला जावे, असे टोपणे त्यांना ऐकावे लागले. मात्र, मुलगा तेव्हा लहान होता. शेती विकली



की परत घेता येणार नाही यामुळे त्यांनी शेतीच करायचा निर्णय घेतला. शेती करताना अनेक अडचणी त्यांच्यामोर आवासून उभ्या होत्या. घरात कोणी कर्ता नसल्याने त्यांची प्रतिका डागाळण्याचे कामही अनेकांनी केले. हे ऐकून ऐकून

आपणही आत्महत्या करावी, असे विचार त्यांच्या मनात येत होते. मात्र, डोळ्यासमोर मुलाचे भवितव्य असल्याने त्यांनी नव्याने उभारी धरली. शेतीतला त्यांना काहीच अनुभव नव्हता. मात्र, त्यांनी काहीही करुन शेती करायची आणि स्वतःला सावरायचे

हा निश्चय केला. निंदणी, खुरपणी, बैलगाडी चालवणे सारेच त्या स्वतः करु लागल्या विशेष म्हणजे त्यांनी नवीन ट्रॅक्टर विकत घेऊन सर्वांना चकीत केले.

**ट्रॅक्टर घेण्याचे कारण...**

शेतीतल्या एका प्रसंगामुळे ज्योतीताईंनी ट्रॅक्टर घेतला. शेतात पेरणी करायची होती. सगळ्या गावाची पेरणी करून झाली, पण ट्रॅक्टरवाला काही त्यांच्या शेतात येत नव्हता. सकाळी ७ वाजता त्यांनी बियाणे आणून ठेवले होते. मात्र, ट्रॅक्टरवाला रात्री आला. त्याने रात्रभर पेरणी केली. ज्यावेळी पीक उगवले त्यावेळी शेतात बऱ्याच ठिकाणी बियाणे पडले नसल्याचे त्यांच्या ध्यानात आले. ट्रॅक्टरवाल्याला त्यांनी याचा जाब विचारल्यावर त्याने सांगितले, की 'तुम्हाला असे वाटत असेल, तर स्वतः ट्रॅक्टर घ्या आणि पेरणी करा'. या घटनेनंतर आता आपण ट्रॅक्टर घ्यायचेच असा दृढनिश्चय केला. पाच वर्षांत त्यांनी दाराशी नवीन ट्रॅक्टर उभे केले. या ट्रॅक्टरवर त्यांनी त्यांचेच नाव टाकले आहे. शेतात बोअरवेलही असल्याने चांगले उत्पन्न त्या घेत आहेत.

**महिलेची शेती फायद्याची?**

महिला शेतकरी असल्याने त्यांचा पुरुषांच्या तुलनेत खर्च कमीच आहे. कोरोनाच्या लॉकडाऊनमध्ये मार्च ते मे २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीत १ हजार १९८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांनी लोकांच्या टोमण्यांकडे लक्ष न देता शेतीत कष्ट करून जीवन जगण्याचा सल्ला देऊन त्या महिलांना शेतीसाठी प्रेरीत करीत आहेत. यंदा ज्योती ताईंच्या शेतात सोयाबीन, कापूस, तर, उदीड या पिकांची पेरणी केली आहे.



# सरकारची सर्व खाती एका छताखाली खासदार स्मितातार्इंमुळेच : ना. सावकारे

## जळगावात प्रगतिशील महाराष्ट्र २०२५ प्रदर्शनाची ऊत्साहात सांगता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या विकासाची झलक प्रगतिशील महाराष्ट्र २०२५ या प्रदर्शनात पहावयास मिळाली. खासदार स्मितताई वाघ यांनी या प्रदर्शनाच्या माध्यमातून केंद्र सरकारची सर्व खाती एका छताखाली आणली, असे गौरवोद्गार वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांनी काढले. खासदार स्मितताई वाघ यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथील फ्रेंडज एक्झिबिशन एंड प्रमोशनतर्फे येथील शिवतीर्थ येथे सुरु असलेल्या प्रगतिशील महाराष्ट्र २०२५ या प्रदर्शनाच्या समारोप सोहळयात ते बुधवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी आमदार राजूमामा भोळे, भाजप संघटन मंत्री रवीजी अनासपुरे, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महाराष्ट्र भाजप युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष भैरवीताई वाघ, गोदावरी शिक्षण संकुलाच्या अध्यक्षा केतकीताई पाटील, माजी जि. प. सदस्य राकेश पाटील, माजी नगरसेवक विशाल त्रिपाठी, अजित राणे, फ्रेंड्ज एक्झिबिशनच्या प्रोजेक्ट हेड अखिला श्रीनिवासन, आरबीआईचे सुनील डोहारे आदी व्यासपीठाव उपस्थित होते.

आमदार राजूमामा भोळे म्हणाले, की मी गेले तीन दिवस प्रदर्शन पाहात आहे. तिनही दिवस जळगावकर या प्रदर्शनाच्या माध्यमातून माहिती मिळवीत आहे. इथे आलेल्या अधिकाऱ्यांनी जनतेला उपयुक्त माहिती दिली. अधिकारी आणि लोकप्रतिनिधिंनी मिळून काम कसे करायचे याचा हा आदर्श वस्तुपाठच होता. तिसऱ्या दिवशीही प्रदर्शनाला अलोट गर्दी उसळली. बुधवारी सूटी असतानाही जळगाव शहर आणि जिल्ह्यातील शाळा आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांसह ग्रामीण भागातील सरपंच, उपसरपंच आणि नागरिकांनी आवर्जून भेट दिली. विभागीय प्रमुख दत्ता थोरे यांनी प्रास्ताविक केले. सरिता खोचने यांनी सूत्रसंचालन केले. प्रोजेक्ट सहाय्यक दीपकसिंग मेहता यांनी आभार मानले.

**सर्वोत्तम स्टॉल्सचा पारितोषिक देऊन गौरव !**

सशस्त्र दलांना सक्षम करण्यासाठी सर्वोत्तम स्टॉल- मुनिशन्स इंडिया लिमिटेड, सर्वोत्तम इंटरॅक्टिव्ह स्टॉल- भारताचे भूगर्भीय सर्वेक्षण, डिजिटल इनोव्हेशन आणि स्मार्ट, सोल्यूशनमधील सर्वोत्तम स्टॉल- गुजरात इन्फॉर्मेटिक्स लिमिटेड, वाहतूक आणि पायाभूत सुविधांमध्ये सर्वोत्तम स्टॉल- भारतीय रेल्वे, बँकिंग क्षेत्रातील सर्वोत्तम स्टॉल- स्टेट बँक ऑफ इंडिया, सर्वोत्तम माहितीपूर्ण स्टॉल- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सायबर सुरक्षेला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वोत्तम स्टॉल- व्हाईट बँड असोसिएट्स, पर्यावरणास अनुकूल आणि शाश्वत उपायांना प्रोत्साहन सर्वोत्तम स्टॉल- फलोत्पादन आणि वृक्षारोपण कॉर्पोरेशन विभाग- तमिळनाडू, ऊर्जा क्षेत्रातील इनोव्हेशनमध्ये सर्वोत्तम स्टॉल- महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महागेनको), वैद्यकीय संशोधनात सर्वोत्तम स्टॉल- भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, सेंद्रिय आणि नैसर्गिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्वोत्तम स्टॉल- ईशान्य कृषी विपणन महामंडळ लिमिटेड (नेरामॅक), बांबूच्या प्रचारासाठी सर्वोत्तम स्टॉल- ओडिशा बांबू विकास एजन्सी, बायोटेक्नॉलॉजी इनोव्हेशनमधील सर्वोत्तम स्टॉल- जैवतंत्रज्ञान विभाग, पोल्ट्री विकास आणि इनोव्हेशनमधील सर्वोत्तम स्टॉल- केंद्रीय कुक्कुटपालन विकास संघटना, सार्वजनिक आरोग्य, इनोव्हेशन आणि ॲडव्हान्सिंग होमिओपॅथी संशोधनातील सर्वोत्तम स्टॉल- केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषद

### प्रकल्प स्पर्धेत शासकीय अभियांत्रिकी प्रथम !

या प्रदर्शनात स्थानिक मुलांना संधी म्हणून शाळा आणि महाविद्यालयातील मुलांची शोधप्रकल्प स्पर्धा घेण्यात आली. यात ऑल इन वन रोबोटिक किट प्रकल्पासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रथम, केसीई अभियांत्रिकी कोलेजच्या मुलांना मशीन पोवर्ड बाय सोलर एनर्जीच्या शोध प्रकल्पासाठी द्वितीय क्रमांक तर पोदार इंटनेशनल स्कुलच्या मुलांना थ्रेट ऑफ हुम्यानीटी या प्रकल्पासाठी तृतीय क्रमांक देऊन गौरविण्यात आले.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार



अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



# मराठी वाङ्मय मंडळातर्फे रंगभूमीदिन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवो**

अमळनेर- मराठी वाङ्मय मंडळातर्फे प्रा. आप्पासाहेब र. का. केले ग्रंथालयाचा वर्धापनदिन व जागतिक रंगभूमी दिन उत्साहात झाला. रजनीताई केले अध्यक्षस्थानी होत्या. त्यांच्या हस्ते प्रा. आप्पासाहेब केले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मराठी रंगभूमी दिनानिमित्त अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सदस्य श्री. नाथा चितळे लिखित 'बालनाट्यसंहिते' चे पूजन करण्यात आले. याप्रसंगी बासरीवादक योगेश पाटील यांनी सुमधुर बासरीवादन करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी संदीप घोरपडे, नरेंद्र निकुंभ, भाऊसाहेब देशमुख, बन्सीलाल भागवत, विवेक भांडारकर, प्रा. यू. जी. देशपांडे, श्रीमती स्नेहा एकतारे व सौ. अरुणा विंचूरकर यांनी मनोगत व्यक्त केले. ॲड. भय्यासाहेब मगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्याम पवार यांनी आभार मानले.

श्यामकांत भदाणे, अजय केले, सौ. विनिता केले, प्रा. डॉ. सुरेश माहेश्वरी, प्रदीप साळवी, डॉ. रवींद्र कुलकर्णी, सौ. कांचन शहा, सोमनाथ ब्रह्मे, प्रा. विजय तुंटे, डॉ. महेश पाटील, ॲड. के. व्ही. कुलकर्णी, अनिल सोनार, दिनेश नाईक, हनुमंत पाटील, ग्रंथपाल हेमंत बाळापूरे, जगदीश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. म. वा. मंडळाचे पदाधिकारी, संचालक, ग्रंथालयाचे सभासद, वाचक व रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानिमित्ताने मराठी संस्कृती व रंगभूमीचा गौरव वृद्धिंगत करण्यात आला.

## वाढदिवसाचा खर्च टाळून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत

पान १ वरून

अशा परिस्थितीमध्ये सभापती अशोक पाटील यांनी आपला वाढदिवस साजरा न करता वाढदिवसाचा खर्च मुडी मांडळ जिल्हा परिषद गटातील वासरे, खेडी, खर्दे या अतिवृष्टीमुळे अत्यंत नुकसान झालेल्या गावातील गरजू शेतकऱ्यांना मदत स्वरूपात देण्याचा निर्णय घेतला. वाढदिवशी जल्लोष न करता माझ्यावर प्रेम करणाऱ्या हितचिंतक व मित्र परिवाराने भेटवस्तू , पुष्पगुच्छ आदी आणू नये. त्याऐवजी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक स्वरूपात मदत द्यावी, असे आवाहन केले होते. यामुळे खऱ्या अर्थाने शेतकरी पुत्राला शोभणारा वाढदिवस साजरा झाल्याचे समाधान झाल्याचे अशोक पाटील यांनी सांगितले.

# भिलाली- शेगाव पायी वारीचे राजवडला स्वागत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पारोळा तालुक्यातील भिलाली ते शेगाव पायी वारीचे प्रस्थान झाले आहे. या वारीचे हे तिसरे वर्ष आहे. आदर्श गाव राजवड येथे वारी पोहोचल्यावर माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी वारकऱ्यांचे स्वागत केले. पालखी व रथ सोहळा अत्यंत भक्तीभावाने पार पडला. साहेबरावदादा पाटील व माजी नगराध्यक्षा सौ. पुष्पलतााताई पाटील यांनी पालखीचे पूजन केले. पारंपरिक वाद्याच्या निनादात राजवड दुमदुमले होते. यावेळी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. जय जय रामकृष्ण हरी, जय श्रीरामच्या जयघोषात भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. गावात यामुळे चैतन्यमय वातावरण होते.











# तुळशीपत्र दानाचे आध्यात्मिक महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिंदू धर्मग्रंथांमध्ये तुळशीची पूजा करण्याचे विशेष महत्त्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील देवउठणी एकादशीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच द्वादशी तिथीला तुळशी विवाह संपन्न होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक शुभप्रसंगी तुळशीची पाने अर्पण केली जातात. असे मानले जाते, की विश्वाचे रक्षक भगवान विष्णू तुळशीच्या पानांवर अत्यंत प्रसन्न होतात. तुळशीपत्र दान करण्यासाठी तुळशी विवाह आणि गुरुवार असे दिवस शुभ मानले जातात. याव्यतिरिक्त रविवारी, एकादशीला आणि ग्रहण लागलेल्या दिवशी तुळशीला स्पर्श करू नये. त्यामुळे या दिवशी दान करणे टाळावे.

खालील श्लोक तुळशीपत्र अर्पणाच्या महत्त्वाबद्दल सांगतो.

**सुधाघटसहस्रेण सा तुष्टिर्न भवेद्धरेः।**
**या च तुष्टिर्भवेन्नृणां तुलसीपत्रदानतः॥**
**गवामयुतदानेन यत्फलं लभते नरः।**
**तुलसीपत्रदानेन तत्फलं लभते सति॥**

**अर्थ :** हजारो अमृतांचे घट श्रीहरीला अर्पण करण्याने जेवढे समाधान मिळत नाही तेवढे समाधान त्यांना एका तुलसीपत्राने मिळणाऱ्या भक्तीने मिळते. तसेच दहा हजार गाई दान केल्याने मनुष्याला जे पुण्य मिळते ते पुण्य तुळशीपत्र अर्पण केल्याने मिळते. या श्लोकात तुळशीचे महत्त्व आणि पावित्र्य अधोरेखित केले आहे आणि असे म्हटले आहे, की तुळशीची पाने दान करणे अत्यंत पुण्यपूर्ण आहे. ज्यामुळे दहा हजार गायी दान केल्यासारखेच फळ मिळते.

तुळशीची पाने तोडण्यापूर्वी तुळशीमातेला नमस्कार करावा आणि तुळशीची पाने तोडताना तुळशीचा हा ध्यान मंत्र जप करावा.

**महाप्रसाद जननी सर्व सौभाग्यवर्धिनी ।**
**आधि व्याधि हरा नित्यं तुलसी त्वं नमोस्तुते॥**
**मातस्तुलसि गोविन्द हृदयानन्द कारिणी ।**
**नारायणस्य पूजार्थं चिनोमि त्वां नमोस्तुते॥**

एखाद्याला तुळशीपत्र दानाऐवजी तुळशीचे रोप भेट द्यावे. तुळशीचे रोप कुणालाही भेट म्हणून देणे शुभ मानले जाते. तुळशीचे रोप भेट म्हणून देणे म्हणजे तुम्ही त्या व्यक्तीविषयी आदर व्यक्त करत आहात. यासोबतच भेटवस्तू घेणाऱ्या व्यक्तीच्या घरात समृद्धीसोबतच सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. तुळशीची वनस्पती हवा शुद्ध करण्यास आणि नकारात्मक शक्तींपासून घराचे संरक्षण करण्यास मदत करते.

एखाद्याला तुळशीचे रोप भेट म्हणून देताना हे लक्षात ठेवा, की एकादशी किंवा रविवारी तुळशीचे रोप इतर कोणालाही देऊ नये. कारण या दिवसांत तुळशीचा स्पर्श निषिद्ध मानला जातो. तसेच तुळशीचे रोप कोरडे नसावे हे लक्षात ठेवा. तुळशीचे रोप एका भांड्यात लावावे आणि भेट म्हणून द्यावे. वास्तूनुसार घराच्या ईशान्य कोपऱ्यात तुळशीचे रोप ठेवल्याने अनेक फायदे होतात. तुळशीचे रोप एखाद्याला भेट देणे शुभ आहे. परंतु ते भेट देताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जेव्हा तुम्ही एखाद्याला तुळशीचे रोप भेट देता तेव्हा ती पूर्णपणे निरोगी असावी आणि प्राप्तकर्त्याने त्याची चांगली काळजी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे वाळलेल्या तुळशीचे रोप दान करू नये, कारण ते अशुभ मानले जाते. ज्योतिषशास्त्रात काही दिवस सांगितले आहेत. ज्यात तुळशीला स्पर्श करणे निषिद्ध आहे. अशा कोणत्याही दिवशी तुळशीचे रोप इतर कोणत्याही व्यक्तीला भेट देऊ नये.

### तुळशीपत्राचे आध्यात्मिक, वैज्ञानिक महत्त्व

मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या मुखात तुळशीपत्र ठेवण्याचे मुख्य कारण म्हणजे आत्म्याला मोक्ष मिळावा आणि मुक्ती व्हावी. तुळस ही पवित्र वनस्पती मानली जाते, जी पापांपासून मुक्ती देते आणि आत्मा शुद्ध करते, असे मानले जाते. यामागे अनेक धार्मिक आणि काही पारंपरिक कारणे आहेत. तुळस ही भगवान विष्णू यांना प्रिय आहे. त्यामुळे तुळशीपत्र ठेवल्याने मृत व्यक्तीला भगवान विष्णूंच्या ठिकाणी जाण्यास मदत होते, असा समज आहे. ज्यानुसार तुळशीपत्र ठेवल्याने मृत व्यक्तीच्या आत्म्याला भगवान विष्णूंच्या चरणी स्थान मिळते, असेही मानले जाते. ग्रहणकाळात अन्नावर तुळशीपत्र ठेवण्याचे कारण धार्मिक आणि वैज्ञानिक आहे. या काळात वैश्विक कंपनांमुळे अन्न आणि पाणी दूषित होऊ शकते, असे मानले जाते, त्यामुळे तुळशीच्या पानांचा वापर केला जातो. कारण तुळस पवित्र आणि शुद्ध मानली जाते आणि ती नकारात्मक ऊर्जा निष्क्रिय करते. ग्रहण सुरू होण्यापूर्वी तुळशीची पाने तोडून सुरक्षित ठेवावी लागतात कारण ग्रहण काळात पाने तोडणे निषिद्ध आहे. तुळशीमध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म अन्नाचे संरक्षण करण्यास मदत करतात असे मानले जाते. तुळशीच्या पानांमध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे ती नकारात्मक ऊर्जा निष्क्रिय करण्यास मदत करते, ज्यामुळे अन्न आणि पाणी सुरक्षित राहते. अन्न आणि पेय पदार्थांमध्ये तुळशीची पाने टाकल्याने ग्रहणाचा अशुभ प्रभाव कमी होतो असे मानले जाते.

आपल्या सर्वांच्या प्रत्येक घरात सुख-समृद्धी नांदो हीच तुळशी मातेला प्रार्थना.

**नमस्तुलसि कल्याणी,**
**नमो विष्णुप्रिये शुभे,**
**नमो मोक्षप्रदे देवी,**
**नमः सम्तप्रदायिके.**

# देवाचे दर्शन थेट घेता येणे शक्य!

अनेक भाविक अशी शंका उपस्थित करतात आणि असे प्रश्न विचारतात, की जसे दोन प्रिय मित्र एकमेकांना भेटतात तसेच या कलियुगातही देवाचे थेट दर्शन शक्य आहे का? शक्य असल्यास त्या मोहक स्वरूपाचे थेट दर्शन लवकरच कसे करता येईल? यासोबतच त्यांना हे देखील जाणून घ्यायचे आहे की सध्या जगात असा कोणी व्यक्ती आहे का ज्याने वर उल्लेख केलेल्या पद्धतीने देवाला भेटले आहे?

प्रत्यक्षात या तीन प्रश्नांची उत्तरे फक्त तेच महापुरुष देऊ शकतात ज्यांना देवाचे थेट दर्शन झाले आहे. जरी मी एक सामान्य माणूस असलो, तरी देवाच्या आणि महापुरुषांच्या कृपेने मी माझ्या मनोरंजनासाठी एकामागून एक तीन प्रश्नांसंदर्भात काहीतरी लिहिण्याचे धाडस करत आहे.

(१) ज्याप्रमाणे सत्ययुगात ध्रुव, प्रल्हाद इत्यादींच्या प्रत्यक्ष दर्शनाचे पुरावे आहेत, त्याचप्रमाणे कलियुगातही सूरदास, तुलसीदास इत्यादी अनेक भक्तांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा इतिहास आहे. खरेतर, विष्णू पुराण आणि अन्य धर्मग्रंथांमध्ये असे म्हटले आहे, की सत्ययुगापेक्षा कलियुगात देवाचे दर्शन करणे खूप सोपे आहे. श्रीमद्भागवतामध्ये असेही म्हटले आहे की,



**कृते यद्धायतो विष्णू त्रेतायन यजतो मखै :**
**द्वापे परिचर्यायन कलौ तद्धिकिरतनात**

सत्ययुगामध्ये विष्णूचे सतत ध्यान केल्याने त्रेतामध्ये यज्ञद्वार यज्ञ करून आणि द्वापारात पूजा (पूजा) करून जी परम स्थिती प्राप्त होते ती कलियुगामध्ये नामजप आणि कीर्तनानेच प्राप्त होते.

ज्याप्रमाणे अरणीच्या लाकडाचे मंथन केल्याने अग्नी प्रज्वलित होतो त्याचप्रमाणे खऱ्या हृदयाच्या प्रेमळ हाकेच्या घासण्याने म्हणजेच त्या देवाच्या प्रेमळ नामजपाच्या खोल आवाजाच्या प्रभावानेही देव प्रकट होतो. महर्षी पतंजली यांनी त्यांच्या योगदर्शनात असेही म्हटले आहे की,

**स्वाध्यायदिष्टदेवतासंप्रयोगः**

नामाचा जप केल्याने, अधिष्ठाता देवता प्रत्यक्ष दिसून येतो.

ज्याप्रमाणे एक सच्चा इच्छा असलेला योगी ज्यासाठी तो संकल्प करतो त्या वस्तूचे प्रकटीकरण करतो.

त्याचप्रमाणे जेव्हा शुद्ध हृदय आणि शुद्ध अंतःकरण असलेला देवाचा खरा भक्त, देवाच्या प्रेमात मग्न होतो. तो ज्या देवाच्या प्रेमळ मूर्तीला पाहू इच्छितो. तेव्हा देव लगेच त्या स्वरूपात प्रकट होतो. गीता अध्याय ११ श्लोक ५४ मध्ये, देवाने म्हटले आहे की,

**भय त्वानन्यय शाक्य अहमेवमविधोजृजुन**
**ज्ञानतुं द्रष्टुं च तत्वेन प्रवेशुं च परंतप**

हे महान तपस्येच्या अर्जुन! अनन्य भक्ती केल्याने मी वास्तवात पाहू आणि जाणू शकतो. मनाच्या एकात्मतेने या स्वरूपात (चतुर्भुज) प्रवेश करू शकतो.

जर एखाद्या प्रियकराला त्याच्या दुसऱ्या प्रियकराला भेटण्याची तीव्र इच्छा असेल. जर दुसऱ्या प्रियकराला हे कळले तर तो स्वतः भेटल्याशिवाय राहू शकत नाही. मग प्रेमाचे स्वरूप असलेला देव, ज्याच्यासारखा प्रेमाचे रहस्य कोणीही जाणत नाही, तो त्याच्या प्रेमळ भक्ताला भेटल्याशिवाय कसे राहू शकतो? म्हणूनच हे सिद्ध होते, की प्रेमाचे स्वरूप असलेला देव, सर्व काळातील आणि सर्व देशांतील सर्व लोकांना भक्तीतून थेट दर्शन देतो.

# चौदा ची महती...!

### चौदा प्रकारचे जप

१) नित्य जप, २) नैमित्तिक जप, ३) कम्यजप, ४) निषिद्ध जप, ५) प्रायश्चित्त जय, ६) अचल जप, ७) चल जप, ८) वाचिक जप, ९) उपांशू जप, १०) भ्रमर जप, ११) मानस जप, १२) अखंड जप, १३) अजपा जप आणि १४) प्रदक्षिणा जप.

### चौदा प्रकारचा भूतसमुदाय

१) सिद्ध , २) गुह्यक, ३) गंधर्व, ४) यक्ष, ५) राक्षस, ६) सर्प, ७) विद्याधर, ८) पिशाच – या आठ देवयोनी आणि ९) सरीसृप, १०) वानर, ११) पशुअ, १२) मृग (जंगली प्राणी), १३) पक्षी – या पांच तिर्यग् योनी व १४) मनुष्ययोनी असा चौदा प्रकारचा भूतसमुदाय अथवा प्राणीमात्र होत.

### चौदा प्रकार यज्ञाचे

१)अग्निष्टोमश, २) अत्यग्निष्टोअम, ३) उक्, ४) षोडशी, ५) वाजपेअय, ६) अतिरात्र, ७) आप्तोर्याम या सात सोमसंस्था आणि ८) अग्निहोत्र, ९) दर्शपूर्णमास, १०) आग्रयण, ११) पिण्डपितृयज्ञ, १२) चातुर्मास्य, १३) निरूढ पशुबंध आणि १४) सौत्रामणी अशा सात हवियज्ञ संस्था मिळून चौदा प्रकार होत.

### चौदा प्रकार रुद्राक्षांचे

एक ते चौदा मुखे असलेल्या रुद्राक्षांची चौदा नावे क्रमाने : १) शिव, २) देवदेवेश्वर, ३) अनल, ४) ब्रह्मा, ५) कालाग्निरुद्र, ६) कार्तिकेय, ७) अनङ्ग, ८) विनायक, ९) मैरव , १०) नजार्दन , ११) रुद्र , १२) आदित्य, १३) विश्वेदेव व १४) परम – शिव.

### चौदा प्रकारच्या शालिग्राम शीला

१) प्रलंबघ्न, २) पुंडरीक, ३) वैकुंठ, ४) मधुसूदन, ५) सुदर्शन, ६) नर ७) राम, ८) लक्ष्मीनारायण, ९) वीरनारायण, १०) क्षीराब्धिशयन, ११) माधव, १२) हयग्रीव, १३) परमेष्ठी व १४) विष्वक्सेन असे एक चक्र असलेले शालिग्रामाचे चौदा प्रकार. माध्व संप्रदायांत शालिग्राम पूजनाचे विशेष महत्त्व मानले आहे.

### चौदा प्राकृत भाषा

१) शौरसेनी, २)महाराष्ट्री, ३) मागवी, ४) अर्धमागधी, ५) प्राच्य किंवा गौडी, ६) अवन्तिका, ७) दाक्षिणात्य, ८) शाकरी, ९) बाल्हिकी, १०) द्राविडी, ११) आभिरी, १२) चाण्डाली, १३) शाबरी व १४) पैशाची ( भारतीय साम्राज्य).

### चौदा प्रांत भाषा

१) आसामी, २) बंगाली, ३) गुजराथी, ४) हिंदी, ५) कानडी, ६) काश्मिरी, ७) मल्याळी, ८) मराठी, ९) ओरिया, १०) पंजाबी, ११) संस्कृत, १२) तमीळ, १३) तेलगू व १४) ऊर्दू या चौदा प्रमुख भाषा प्रांतभाषा म्हणून भारतीय घटनेने मान्य केल्या आहेत. ( हिंदी राज्यघटना ) खेरीज साहित्य ॲकॅडमीने इंग्रजी व सिंधी या दोन भाषांस काही प्रमाणात मान्यता दिली आहे.

### चौदा प्रमुख नाड्या

१) सुषुम्ना, २) इडा, ३) पिंगला, ४) कुहू, ५) गांधारी, ६) हस्तिजिव्हा, ७) सरस्वती, ८) पूषा, ९) पयस्विनी, १०) शंखिनी, ११) यशस्विनी, १२) करुणा, १३) विश्वोदरा आणि १४) अलम्बुषा ( योगशास्त्र ).

### चौदा प्रमुख स्त्रोते

१) प्राणवह, २) उदकवह, ३) अन्नवह, ४) रसवह, ५) रक्तवह, ६) मांसवह, ७) मेदोवह, ८) अस्थिवह, ९) मज्जावह, १०) शुक्रवह, ११) आर्तववह, १२) पुरीषवह, १३) स्वेदवह, १४) शरीरांत उत्पन्न होणाऱ्या असंख्य भावांचे उत्पादन व वहन करणाऱ्या अंसख्य स्त्रोत शास्त्रकारांनी वर्णिली आहेत.

### चौदा बले राज्यशासकांची

( अ ) १. देश, २. दुर्ग, ३. रथ, ४. हत्ती, ५. घोडे, ६. योद्धे, ७. राज्याधिकारी, ८. अंतःपूर, ९. अन्नव्यवस्था, १०. अश्वरथादिकांचा पुरवठा, ११. नीती, १२. आयव्यय, १३. द्रव्य – पुरवठा आणि १४. गुप्तशत्रू ही चौदा राज्यशासकांचे बलाबल आजमावण्याची स्थाने होत. ( आ ) १. अंगबल, २. स्वतःचे शरीरबल, ३. सेनाबल, ४. कोशबल, ५. दुर्गबल, ६. कोटकिल्ले, ७. शक्तिबळ, ८. मंत्रबळ, ९. – १०. – ११. वेदत्रयबळ ( आयुर्वेद, धनुर्वेद व गांधर्ववेद ) १२. बुद्धिबळ, १३. ब्राह्मणशेष सुकृतबळ आणि १४. अन्य राज्यांचे साह्यबळ.

### चौदा ब्रह्मे

१) शब्दब्रह्म, २) नित्येकाक्षरब्रह्म, ३) खंब्रह्म, ४) सर्वब्रह्म, ५) चौतन्यब्रह्म, ६) सत्ताब्रह्म, ७) साक्षिब्रह्म, ८) सगुणब्रह्म, ९) निर्गुणब्रह्म १०) वाच्याब्रह्म, ११) अनुभवब्रह्म, १२) आनंदब्रह्म, १३) तदाकारब्रह्म व १४) अनिर्वाच्यब्रह्म.....

### चौदा मनू

१) स्वायंभुव, २) स्वारोचिष, ३) उत्तमनू, ४) तामसमनू, ५) रैवत, ६) चाक्षुष, ७) वैवस्वत, ८) सावर्णी, ९) दक्षसावर्णी, १०) ब्रह्मा सावर्णी, ११) धर्मसावर्णी, १२) रुद्रसावर्णी, १३) देवसावर्णी व १४) इंद्रसावर्णी. सृष्टीचक्रांत असलेली, कोकस्थिती काही कालाने बिघडते व पुन्हा ती ताळ्यावर आणण्यासाठी जुळवाजुळव होते. हा जो जुळवाजुळव होऊन मोडेपर्यंतचा काल त्यास मन्वन्तर म्हणतात. त्या मन्वन्तराचा अधिपती तो मनू. असे चौदा मनू आहेत, अशी कल्पना आहे.

### चौदा मन्वन्तरे

१) स्वायंभुव, २) स्वारोचिष, ३) उत्तम, ४) तामस, ५) रैवत, ६) चाक्षुष, ७) विवस्वत, ८) सावर्णी, ९) धर्म, १०) सावर्णिक, ११) पिशंग, १२) अपिशंगाम, १३) शबल आणि १४) वर्णक. ब्रह्मदेवाचे एक अहोरात्र म्हणजे कल्प, असे तीस कल्प सांगितले आहेत. एका कल्पात चौदा मन्वन्तरे होतात. सध्या चालू असलेल्या वाराह कल्पांतल्या सातव्या मन्वन्तराचे नाव वैवस्वत आहे.

### चौदा मन्वतरावतार

१) यज्ञ, २) विभू, ३) सत्यसेन, ४) हरी, ५) वैकुंठ, ६) अजित, ७) वामन, ८) सार्वभौम, ९) ऋषभ, १०) विष्वक्सेन, ११) धर्मसेतू, १२) सुदामा, १३) योगेश्वर व १४) बृहद्भानू.

### चौदा माहेश्वरी सूत्रे

१) अ इ उ ण्, २) ऋ लृ क्, ३) ए ओ ङ्, ४) ए ओ च् , ५) ह य व र ट्, ६) ल ण्, ७) ञ म ङ ण न म्, ८) झ भ ञ्, ९) घ ढ ध ष्, १०) ज ब ग ड द श्, ११) ख फ छ ठ थ च ट त व्, १२) क प य्, १३) श ष स र् आणि १४) ह ल्. ही मूळ सूत्रे पाणिनीने अठ्ठावीस दिवस तप करून शंकराकडून मिळविली. ( भ. प्रतिसर्ग ४ – ३० ) पाणिनीच्या कठोर तपामुळे भगवान शंकराने प्रसन्न होऊन तांडव नृत्य करीत असताना जो डमरू वाजवला त्यातून निघालेल्या चौदा ध्वनी – नादामुळे ही मूळ चौदा सूत्रे ध्वनीरूपाने निघाली.

### चौदा यज्ञ (गीतोक्त)

१) ब्रह्मयज्ञ, २) द्रव्यज्ञ, ३) देवयज्ञ, ४) ज्ञानेंद्रिययज्ञ, ५) विषययज्ञ, ६) स्वाध्याय – ज्ञानयज्ञ , ७) प्राणयज्ञ, ८) अपानयज्ञ, ९) प्राणापानयज्ञ, १०) आंतरपानयज्ञ, ११) योगयज्ञ, १२) तपोयज्ञ , १३) जपयज्ञ व १४) इंद्रियप्रान – कर्मयज्ञ. या सर्वांत जपयज्ञ महत्त्वाचा होय.

### चौदा यमधर्म

१) यम, २) धर्मराज, ३) मृत्यू, ४) अंतक, ५) वैवस्वत, ६) नील, ७) दध्न, ८) काल, ९) सर्वभूत, १०) षरमेष्ठी, ११) वृकोदर, १२) औदुंबर, १३) चित्र व १४) चित्रगुप्त.

### चौदा रत्ने

**( अ )** देव आणि दानव यांनी समुद्रमंथन करून चौदा रत्ने अथवा मौल्यवान् वस्तू काढल्या त्या– १) लक्ष्मी, २) कौस्तुभ, ३) पारिजातक, ४) सुरा, ५) धन्वंतरी, ६) चंद्र, ७) कामधेनू, ८) ऐरावत, ९) रंमा (आदि अप्सरी), १०) उच्चैःश्रव नामक सप्तमुखी अश्व (हा श्चेतवर्ण व उन्नतकर्ण असा होता), ११) कालकूट विष, १२) शाङ्‌र्ग धनुष्यश, १३) पांचजन्य शंख व १४) अमृत होय.

**( आ )** प्रत्येक जातीतील श्रेष्ठ वस्तूला रत्न अशी संज्ञा आहे. अशी चौदा प्रकारची रत्ने पुराणात वर्णिली आहेत ती : १) हत्ती, २) घोडा, ३) रथ, ४) स्त्री, ५) पुरुष, ६) कोश (धन), ७) पुषमाला, ८) वस्त्र, ९) वृक्षराजी, १०) शक्ती, ११) पाश, १२) मणी, १३) छत्र व १४) विमान.

### चौदा रत्ने वेदाब्धिमंथनातून निघालेली

१) विष – काम, २) मणी – अर्थ, ३) रंभा – नरकप्रदवेश्या, ४) वाजी, ५) श्री – शक्ती, ६) वारुणी – अभिमान, ७) धन्वतरी – विष्णू , ८) शंख – मोक्ष, ९) धेन – धर्म, १०) धनू – मर्न्य – युद्ध – संघर्ष, ११) चंद्र – आल्हाद तत्त्व शिव, १२) कल्पवृक्ष – खर्ग (त्रिवर्गभोग), १३) गज ऐरावत – गणेश गजानन आणि १४) अमृत–कथा.

### चौदा रोगभेद

१) सहजरोग, २) गर्भजरोग, ३) जातज्ञातरोग, ४) पीडाजनितरोग, ५) कालरोग, ६) प्रभावजरोग, ७) स्वभावजरोग, ८) देशजरोग ९) आगंतुकरोग, १०) कायिकरोग, ११) आंतररोग, १२) कर्मजरोग, १३) दोषजरोग आणि १४) कर्मदोषजरोग.

